**MHKO200000792022**

## नियमीत दिवाणी दावा क्रं. २२/२०२२ मधील नि.क्रं. १८ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे अमर बंडोपंत पाटील व सौ.सविता तानाजी केसरकर यांना प्रतिवादी क्रं. २ व ३ म्हणून दाव्यात समावून घेण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी यांचे कथन असे की, सदरचा दावा हा मौजे वाघुर्डे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील भू. गट क्रं.१२५/अ, १२५/ब, १२५/क व ४९५ बाबत दावा मिळकत अग्रहक्काने खरेदी मिळणेकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता म्हणून दाखल केला आहे.

**०३.** प्रतिवादीस दावेची समन्स व मनाई अर्जाची नोटी लागू झाले नंतर नि.क्रं.१० आपली कैफियत दाखल केली आहे. सदर कैफियतीमध्ये प्रतिवादीने दावा मिळकत १ भू.ग.क्रं.१२५-अ ही मिळकत दि. २१.०१.२०२२ रोजी नोंदणीकृतदस्त क्रं. २०७/२०२२ ने अमर बंडोपंत पाटील व सविता तानाजी केसरकर यांना तबदिल केलेची कथन केले आहे. त्यामुळे वादीने दस्ताप्रमाणे खरेदी घेणार यांना याकामी प्रतिवादी म्हणून दाव्यामध्ये पक्षकार करणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदर खरेदी घेणार अमर बंडोपंत पाटील व सविता तानाजी केसरकर यांना प्रतिवादी क्रं. २ व ३ म्हणून दाव्यामध्ये व मनाई अर्जामध्ये समाविष्ठ करणेस परवानगी

मिळाली ही विनंती केली आहे.

०४. सदर अर्जास प्रतिवादी क्रं. १ यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केले मुळे त्यांचे विरुध्द म्हणणे नाही असा आदेश करण्यात आला. तर त्रयस्त पक्षकार यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे नि. २८ वर दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा सदरचा अर्ज खोटा, बनावट व लबाडीचा असून त्यातील मजकूर त्यांना मान्य नाही. सदर अर्जात नमूद केलेला मजकूर हा अपूर्ण व चुकीचा आहे. वादी यांनी दावा मिळकत वाघुर्डे ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील भू.मापन गट नंबर १२५/अ,ब,क व ४९५ या मिळकती अग्र हक्काने मिळणे बाबतची मागणी पूर्णपणे चुकीची व बेकायदेशीर आहे.

०५. सदर मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत एकत्र कुटुंबाची मालकी वहिवाटीची मिळकती मधील वादीचा हिस्सा सरस निरस मानाने वाटप होऊन तुटक होऊन मिळावा म्हणून पन्हाळा कोर्टात रे.क.नं.१०९/१९९० चा दावा दाखल केला होता. सदर दावा मंजूर होऊन वादीचा ५/१२ हिस्सा सरस निरस मानाने वाटप होऊन तुटक होऊन मिळणे विषयी आदेश पारित झाला. त्या प्रमाणे सी.पी.सी. ५४ प्रमाणे जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात आले व त्याप्रमाणे रितसर कब्जे पट्टी होऊन २१.०१.२०१८ ला तहसिलदार पन्हाळा यांनी पारित केलेल्या आदेशा प्रमाणे कब्जे पट्टी देण्यात आली आहे. त्यानंतर थर्ड पार्टी अर्जदाराने सदर मिळकत नोंदणीकृत खरेदीदस्ताने खरेदी घेतली आहे. त्यामुळे वादी हा गट नंबर १२५ अ या मिळकतीचा सहहिस्सेदार नाही अथवा लगतचा जमिनीचा

धारक नाही. त्यामुळे वादी यांना अग्रहक्काने मागण्याचा काहीही हक्क व अधिकार नाही त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर केरावा अशी विनंती केली आहे.

**०६.** त्रयस्थ पक्षकारतर्फे युक्तीवाद ऐकला. दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा अग्रहक्काने खरेदी खरेदीसाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. दाव्यात नमुद केलेल्या मिळकती हया प्रतिवादी क्रं. १ यांनी थर्ड पार्टी अर्जदार क्रं. १ व २ यांना खरेदी दिल्याच्या त्याचे कैफियतीमध्ये मान्य केल्या आहेत तथापि, अमर बंडोपंत पाटील व सविता तानाजी केसरकर यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून सामिल केलेले नाही. अशा परिस्थितीत दाव्याचे स्वरुप विचारात घेता त्रयस्थ पक्षकार यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. अग्रहक्काचा मुद्दा त्यासाठी लागणारे पुरावे समोर येण्याकरीता त्रयस्त पक्षकार १ व २ यांना सामील करणे उचित होईल.

**०७.** वादी यांनी सदर अर्जात त्रयस्त व्यक्ती प्रतिवादी २ व ३ म्हणून समाविष्ठ करण्यासाठी व दाव्यात व मनाई अर्जात वेगवेगळया दुरुस्त्या सुचविल्या आहेत. परंतु सदर अर्जाचा विचार करता फक्त त्रयस्त व्यक्ती समाविष्ठ करुन घेण्या बाबतच आदेश करणे उचित होईल. त्यामुळे वादी यांनी दावा व मनाई अर्ज दुरुस्ती कामी वेगळा अर्ज गरज असल्यास करावा. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अशंतः मंजूर करण्यात आला आहे.

२. त्रयस्थ पक्षकार अमर बंडोपंत पाटील यांना प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्रं. २ व सविता तानाजी केसरकर

यांना प्रतिवादी क्रं. ३ म्हणून सामील करणेत यावे.

३. वादीने सदरची दुरुस्ती या आदेशापासून १५ दिवसात करावी.

Neha K.Nagargoje
Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2022.08.29 17:29:44 +0530

( नेहा कों.नागरगोजे )

कळे–खेरीवडे
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दि.२९.०८.२०२२.
कळे–खेरीवडे.